


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २३०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०२ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## लाडक्या बहिणींना दिलासा! ३० एप्रिलपर्यंत करु शकतात ई केवायसी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, मुंबई :** लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची शेवटची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी म्हणजे काल संपली होती. पण आता लाडक्या बहिणींसाठी पुन्हा एकदा एक मोठी बातमी आहे. लाडक्या बहिणींना आता आपली ई-केवायसी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ई-केवायसीची शेवटची मुदत ३० एप्रिल २०२६ आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली आहे.




**काय आहे लाडकी बहीण योजना?**

विधानसभा निवडणुकीआधी सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांच्या बँक खात्यावर प्रत्येक महिन्याला १५०० रुपये निधी जमा करण्यात येतो. या लोकप्रिय योजनेचा फायदा महायुती सरकारला चांगल्या पद्धतीने झाला, जे आता आपल्यासमोर आहे. मात्र, या योजनेत बोगस लाभार्थीसुद्धा याचा फायदा घेत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं. फक्त आणि फक्त अडीच लाखांचे उत्पन्न असणाऱ्यांसाठीच असलेल्या या योजनेत भल्याभल्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील लाभ घेतल्याचं सम ोर आलं. या चुकीच्या प्रकारांवर अंकुश लावण्यासाठी ई-केवायसीची संकल्पना अंमलात आणली गेली, आणि बोगस लाभार्थ्यांना या योजनेतून गेट-आऊट करण्याची योजना आखली.

**ई-केवायसीची मुदत वाढवली**

त्यानुसार ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ची शेवटची मुदत देण्यात आली. मात्र, त्यादरम्यान देखील महिलांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. नेमकं त्याचवेळी या संकेतस्थळात तांत्रिक अडचणी येऊ लागल्या आणि बऱ्याच महिलांच्या ई-केवायसी करण्यापासून वंचित राहिल्या. तरीही १ कोटी ७० लाख महिलांना ई-केवायसी करण्यात यश आलं. मोठी बाब म्हणजे, अनेक महिलांनी कुटुंबातील व्यक्ती सरकारी नोकरीत आहे किंवा नाही यासाठी देण्यात आलेल्या पर्यायांतून चुकीचा पर्याय निवडल्याने अनेक महिलांचा १५०० रुपयांचा हफ्ता आपोआप बंद झाला. दरम्यान, अशा महिलांच्या तक्रारीनंतर किंवा ज्यांची ई-केवायसी राहिलीय, अशा महिलांसाठी पुन्हा ३१ मार्च २०२६ची मुदत देण्यात आली, ती मुदत देखील काल मंगळवारी संपली. मात्र, त्याचदरम्यान, आता पुन्हा ही मुदतवाढ करुन ३० एप्रिल २०२६ करण्यात आली आहे.

## विंचूर येथे भीषण अपघात, भरधाव कंटेनरची स्कॉर्पिओ आणि दुचाकीला धडक

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**




**दि.०१, विंचूर (नाशिक) :** येथील निफाड-विंचूर रोडवर असलेल्या वेदांत हॉटेलसमोर मंगळवारी दुपारी एका भरधाव कंटेनरने पोलीस कर्मचाऱ्याच्या स्कॉर्पिओला आणि त्यामागील दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तिघे जण गंभीर जखमी झाले असून वाहनांचे मोठ्या प्रम ाणावर नुकसान झाले आहे.

**अपघाताचा थरार...**

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास नाशिक पोलीस मुख्यालयातील कर्मचारी कैय्युम सय्यद मोहमद अली (४२) हे आपल्या स्कॉर्पिओने (चक ०१ एऋ २७९१) जात होते. याच वेळी समोरून येणाऱ्या आयशर कंपनीच्या कंटेनरने (MP 09 BL 6940) त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती की स्कॉर्पिओ मागे फेकली गेली आणि मागून येणारी सी.बी.झेड. एक्स्ट्रिम दुचाकी (चक १५ घग ०९३८) या स्कॉर्पिओवर आदळली.

**जखमींची माहिती...**

या अपघातात खालील व्यक्ती जखमी झाल्या आहेत:

वैभव सुभाष पगारे (दुचाकी चालक): डोक्याला आणि तोंडाला गंभीर दुखापत.

रोहित सुकदेव वाघ (रा. पाटोदा, येवला): चेहऱ्यावर आणि डोक्याला गंभीर इजा.

कैय्युम सय्यद मोहमद अली (फिर्यादी): गंभीर जखमी.

फिर्यादींची आई: किरकोळ जखमी.

**पोलिसात गुन्हा दाखल :** याप्रकरणी कंटेनर चालक सुनील पाटीदा (रा. देवास, मध्य प्रदेश) याच्या विरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हे: बी.एन.एस. कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) आणि मोटार वाहन कायदा कलम १८४.

तपास: सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक संदीप धुमाळ पुढील तपास करत आहेत.

## कल्याण हादरलं! गुप्त कप्प्यातून शस्त्रांचा मोठा साठा उघड

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, डोंबिवली :** कल्याण गुन्हे शाखा युनिट-३ ने केलेल्या धडक कारवाईत अवैध अग्निशस्त्रांचा मोठा साठा व लाखोंच्या बनावट नोटा जप्त करत एका सराईत गुन्हेगारास अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांच्या दक्षतेचे कौतुक केले जात आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट-३ कल्याणकडून अवैध शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवले जात असताना सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार डोंबिवली पूर्व येथील दावडी परिसरात राहणारा सुरेंद्र पांडुरंग पाटील (वय ५५) हा अवैध शस्त्रसाठा बाळगून असल्याची खात्री पटली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संबंधित आरोपीस ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या राहत्या घरावर टाकलेल्या छाप्यात धक्कादायक बाब समोर आली. घरातील टेरेसवर गुप्त कप्पा तयार करून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रे व दारुगोळा लपवून ठेवण्यात आला होता.

या छाप्यात पोलिसांनी ३ देशी बनावटीचे पिस्टल, १ सिक्सर रिव्हॉल्वर, ७ गावठी कट्टे, १ रिकामी मॅगझिन, २ एअर गन, ४०५ जिवंत काडतुसे, १६७ छरे, २ धारदार तलवारी, ३ कोयते, १ धारदार सुरा, १ बटन चाकू, २ लोखंडी रॉड तसेच २ मोबाईल फोन असा मोठा साठा जप्त केला. यासोबतच ३ लाख ५२ हजार रुपयांच्या जुन्या व नवीन बनावट नोटाही हस्तगत करण्यात आल्या. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १२ लाख २१ हजार रुपये इतकी आहे.




या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र कायदा कलम ३, ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून तो सध्या पोलीस कोठडीत आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील करत आहेत.

दरम्यान, अटक करण्यात आलेला सुरेंद्र पाटील हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी अपहरण, घरफोडी, मारहाण, धमकी, शस्त्र बाळगणे आदी गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे विविध पोलीस ठाण्यांत दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या अटकेमुळे परिसरात दिलासा व्यक्त केला जात आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), पोलीस उपायुक्त (गुन्हे) व सहायक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३, कल्याणच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## माथेरान नेरळ मिनी ट्रेन जुमापट्टी भागात फायबर केबल ला आग कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने अनर्थ टळला

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान :** नेरळ–माथेरान मिनी ट्रेन मार्गावरील जुनामट्टी परिसरात रेल्वेच्या फायबर ऑप्टिकल केबलला आग लागल्याची घटना घडली. या आगीत केबलचे बाहेरील सुरक्षा कवच पूर्णपणे जळून गेले असून आग मुख्य केबलपर्यंत पोहोचली होती. मात्र ५२०१३ डाऊन मिनी ट्रेनमधील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने आग विझवली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. ही केबल रेल्वेच्या दळणवळण व इंटरनेट सेवेसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने मोठे नुकसान होण्याची शक्यता होती. तसेच आग पसरली असती तर जंगलात वनवा लागण्याची भीतीही व्यक्त होत होती.या घटनेत तपासणी कर्मचारी विजय लांडे, विजय दांडगे, लोको पायलट व्ही. एम. चौथे आणि पी. एम. एस. बडी एस. मीना तसेच इतर कर्मचाऱ्यांनी सतर्कता दाखवत परिस्थिती नियंत्रणात आणली.दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप समजले नसून रेल्वे प्रशासन याबाबत सखोल चौकशी करणार असल्याची माहिती मिळत आहे. या धाडसी कृतीबद्दल कर्मचाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## राज्यभरातील रिक्षा चालकांचा ८ एप्रिल रोजी परिवहन कार्यालयावर मोर्चा

**दि.३१, मुंबई :** धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळच्या नोंदणीसाठी रिक्षाचालकांकडून ५०० रुपये प्रवेश शुल्क आणि ३०० रुपये वार्षिक शुल्क भरण्याबाबत सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये करण्यात येणारी सक्ती तातडीने बंद करावी या मागणीसाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांवर ८ एप्रिल रोजी रिक्षा चालक-मालकांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.

ऑटोरिक्षा चालकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करावे व त्यामार्फत ऑटोरिक्षा चालकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवाव्या, ही दीर्घकाळ प्रलंबित मागणी ऑटोरिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. ऑटोरिक्षा चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करत असताना शासनाने राज्यातील प्रमुख ऑटोरिक्षा संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणे आवश्यक होते. परंतु शासनाने कोणाशीही चर्चा न करता एकतर्फी निर्णय घेतला व कल्याणकारी मंडळ स्थापन केले. या मंडळात सभासद होण्यासाठी ऑटोरिक्षा चालकांना ५०० रुपये प्रवेश शुल्क आणि तसेच वार्षिक शुल्क म्हणून ३०० रुपये भरणे बंधनकारक केले आहे.

दरम्यान कृति समितीने सरकारच्या या निर्णयाचा विरोध केला आहे. त्यामुळे बहुतांश ऑटोरिक्षा चालक मालकांनी कल्याणकारी मंडळामध्ये नोंदणी केली नाही.

ऑटोरिक्षा चालकांनी कल्याणकारी मंडळात नोंदणी करावी, यासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये ऑटोरिक्षा चालक – मालकांवर जबरदस्ती केली जात आहे. ज्या रिक्षाचालक मालकांनी मंडळात नोंदणी केली नाही, त्यांचे आरटीओ कार्यालयात परमिट नूतनीकरण, पासिंग यासारखी कामे केली जात नाहीत. हे कृत्य पूर्णपणे बेकायदेशीर असून कृति समितीकडून याचा निषेध करण्यात आला आहे.

रिक्षाचालक मालकांवर धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळात नोंदणी करण्यास सक्ती करण्यात येऊ नये. जे बेकायदेशीर रित्या सक्ती करत असतील, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. याबाबतचे निवेदन २३ मार्च रोजी परिवहन मंत्री आणि परिवहन आयुक्त यांना प्रादेशिक-उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आले. त्यावर तातडीने कार्यवाहीची मागणी केली होती. परंतु ऑटोरिक्षा चालकांच्या मागणीला न्याय मिळाला नाही.

प्रवेश शुल्क आणि वार्षिक शुल्क भरण्यासाठी सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये गैरकायदेशीर रित्या करण्यात येणारी सक्ती तातडीने थांबवावी. याकरिता राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांवर ८ एप्रिल रोजी ऑटोरिक्षा चालक – म ालकांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्च्यात मोठ्या संख्येने ऑटोरिक्षा चालक – मालक उपस्थित राहतील, असे ऑटोरिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष शशांक राव यांनी सांगितले.

## राज्यातील पहिल्या 'इंडियन नॉलेज सिस्टीम' अभ्यासक्रमाचा बल्लारपूर येथे शुभारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, बल्लारपूर (चंद्रपूर) :** भारतीय संस्कृती ही केवळ परंपरेपुरती मर्यादित नसून संपूर्ण जगाला दिशा देणारी जीवनपद्धती आहे. शिक्षणासोबत संस्कार, विज्ञानासोबत मूल्ये आणि राष्ट्रभक्तीची जाणीव यांचा संगम घडवणे ही काळाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. एसएनडीटी महिला विद्यापीठातर्फे बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील नव्या कॅम्पसमध्ये राज्यातील पहिल्या 'बी.ए. इन इंडियन नॉलेज सिस्टीम' या अभ्यासक्रमाचे उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, भारतीय ज्ञान विज्ञानचे आचार्य दिनेश कुमार, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव, कुलसचिव डॉ. विलास नांदावडेकर, भाग्यस केंद्राचे संचालक जितेंद्र कुमार तिवारी, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक प्रभाकर चव्हाण, भाजपा नेते चंदनसिंग चंदेल, बल्लारपूर एसएनडीटी विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. राजेश इंगोले, उपकुलसचिव डॉ. बाळू राठोड, व्यवस्थापन परिषद सदस्य पौर्णिमा मेहता, डॉ. प्रांजल बोगावार, चित्रा जोशी, सिनेट सदस्या डॉ. मंजुषा कानडे, प्राचार्य डॉ. निता लांबे, डॉ. सुशील मुंदडा, सन्मित्र सैनिक विद्यालयाच्या प्राचार्य अरुंधती कावडकर, ॲड. निलेश चौरे, डॉ. दीनदयाल कावरे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, अधीक्षक अभियंता सोनाली चव्हाण आदी उपस्थित होते




आ. मुनगंटीवार यांनी भारतीय संस्कृतीचे वैश्विक महत्त्व विषद करताना सांगितले की, 'आज संयुक्त राष्ट्र संघही केवळ आर्थिक निकषांवर देशांची प्रगती न मोजता 'हॅपिनेस इंडेक्स'च्या माध्यमातून मोजत आहे. आनंद, समाधान आणि कुटुंबव्यवस्था यांसारख्या म ूल्यांचा विचार भारताने हजारो वर्षांपूर्वीच मांडला असून, हीच भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारताची 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना आणि सर्वसमावेशक संस्कृती जगासाठी आदर्श असल्याचे सांगत त्यांनी दीर्घकाळ परकीय आक्रमणांनंतरही भारतीय संस्कृती टिकून राहिल्याचा उल्लेख केला. मात्र, या संस्कृतीचा व्यापक प्रसार आणि शिक्षणात तिचा प्रभावी समावेश करण्यासाठी अधिक प्रयत्न होण्याची गरज आहे.'

चीनसारख्या देशाचे उदाहरण देत त्यांनी शिक्षण आणि संस्कार यांचा समतोल साधल्यामुळेच काही राष्ट्रांनी वेगाने प्रगती साधली असल्याचे नमूद केले. तर गर्भसंस्कार आणि बालसंस्कार यांचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी लहानपणापासूनच होत असल्याचे स्पष्ट केले. इंग्रजी शिक्षणपद्धतीवर भाष्य करत त्यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेत मूल्याधारित शिक्षणाचा अभाव असल्याची खंत व्यक्त केली. मातृदेवो भव, आचार्य देवो भव यांसारख्या संकल्पना केवळ पुस्तकांपुरता न राहता त्या प्रत्यक्ष आचरणात उतरायला हव्यात, असे त्यांनी ठामपणे सांगितले.




## भक्तशिरोमणी हनुमान !

भक्त कसा असावा तर तो महाबली हनुमंतासारखा असावा. हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या निस्सीम भक्तीची आजतागायत अनेक उदाहरणे आपण गोष्टींच्या रूपाने वाचली आणि ऐकली आहेत. प्रचंड सामर्थ्य असतानाही आपल्या आराध्याप्रती कसा भक्तिभाव असावा हे हनुमंताच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. सप्त चिरंजीवांपैकी एका असलेल्या भक्तशिरोमणी हनुमंताची जयंती यंदा शनिवारी आल्याने तिला विशेष महत्व असणार आहे. अशा भक्तवत्सल, महाबली हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या भक्तीचे एक उदाहरण आज आपण पाहणार आहोत. 'एकदा हनुमानाची निस्सीम भक्ती पाहून प्रभु श्रीरामाने हनुमानाला वर मागण्यास सांगितले. 'जो कुणी प्रभु श्रीरामाचे स्मरण करत असेल, त्याचे संरक्षण हनुमंत करील आणि कुणीही त्या व्यक्तीचे अहित करू शकणार नाही', असा वर हनुमानाने मागितला. प्रभु श्रीरामाने 'तथाऽस्तु' म्हटले. त्रेतायुगात प्रभु श्रीराम अयोध्येचे राज्य करत असतांना काशीनरेश सौभद्रच्या मनात रामभेटीची मनीषा जागृत झाली. त्याच वेळी महर्षि विश्वामित्र यांच्याही मनात प्रभु श्रीरामाला भेटण्याची इच्छा निर्माण झाली. दोघेही अयोध्येच्या दिशेने निघाले. वाटेत एका शिव मंदिरात दोघांची भेट झाली. विश्वामित्रांचे शिष्य शिवाच्या मंदिरात विश्वामित्रांचा जयजयकार करत होते. 'शिवाच्या मंदिरात केवळ शिवाचाच जयघोष झाला पाहिजे, अन्य कुणाचाही जयजयकार केला, तर शिवाचा अपमान होतो', असे सौभद्र राजाला वाटले आणि त्याने विश्वामित्रांच्या जयजयकाराला विरोध केला. त्यामुळे महर्षि विश्वामित्र त्याच्यावर कोपले आणि त्यांच्यात वाद झाला. दोघेही जेव्हा अयोध्येत पोचले, तेव्हा त्यांना एकाच वेळी प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले. महर्षि विश्वामित्रांनी प्रभु श्रीरामाला काशीनरेशाला कठोर शिक्षा करण्याची आज्ञा केली. प्रभु श्रीरामाने दुसर्या दिवशी न्यायसभेत वरील प्रसंगाचा न्यायनिवाडा करणार असल्याचे घोषित केले. 'प्रभु श्रीराम महर्षि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून आपल्याला कठोर दंडित करतील', या विचाराने सौभद्र भयग्रस्त झाला. इतक्यात तेथे नारदमुनी प्रगट झाले आणि त्यांनी सौभद्राला हनुमंताची माता अंजनीदेवीला शरण जाण्यास सांगितले. नारदमुनींच्या सांगण्यावरून सौभद्र सुमेरूला गेला आणि त्याने अंजनीमातेचे चरण धरले. अंजनीमातेने त्याची स्थिती जाणून घेतल्यावर त्याचे रक्षण करण्याचे अभय वचन दिले. तिने हनुमंताला काशीनरेशाचे रक्षण करण्याचे दायित्व सोपवले. हनुमानाने ते स्वीकारले आणि तो दुसर्या दिवशी सौभद्राला सोबत घेऊन पवन वेगाने अयोध्येला येऊन पोचला. त्याने सौभद्रराजाला निर्भय होऊन शरयू नदीच्या किनारी अखंड रामनामाचे स्मरण करत रहाण्यास सांगितले. सौभद्रराजाने अचानक पलायन केल्याची वार्ता दुसर्या दिवशी महर्षि विश्वामित्रांना समजल्यावर ते अधिकच कोपित झाले. त्यांनी श्रीरामाला सौभद्राचा वध करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रभु श्रीरामाने सूर्यास्त होण्यापूर्वी सौभद्राचा वध करण्याचा पण केला. प्रभु श्रीरामाचे सैनिक सौभद्राला सर्वत्र शोधत होते. त्यांनी तो शरयू नदीच्या किनारी हनुमंतासह रामनामात मग्न असल्याची सूचना महर्षि विश्वामित्र आणि श्रीराम यांना दिली. महर्षि विश्वामित्रांसह प्रभु श्रीराम धनुष्य बाण घेऊन शरयू किनारी आले. त्याने पाहिले की, हनुमान पुढे बसलेला आहे आणि त्याच्या मागे सौभद्र राजा बसलेला आहे. दोघेही रामनामाचा अखंड जप करत आहेत. प्रभु श्रीरामाने हनुमानाला बाजूला होण्यास सांगितले, तेव्हा हनुमानाने श्रीरामाला त्यांनी पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. महर्षि विश्वामित्रांनी सौभद्रावर बाण चालवण्याचा आग्रह केला. प्रभु श्रीरामाला कळेना, 'हनुमानाला दिलेले वरदान खरे करावे कि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून केलेला पण पूर्ण करावा ?' अखेर गुरुस्थानी असणार्या महर्षि विश्वामित्रांच्या आज्ञेवरून प्रभु श्रीरामाने सौभद्रावर बाण सोडला. हनुमानाच्या कृपेमुळे सौभद्राभोवती रामनामाचे संरक्षण निर्माण झाले होते. त्यामुळे प्रभु श्रीरामाचा बाण सौभद्राला लागला नाही. प्रभु श्रीरामाने अनेक बाण सोडले; परंतु एकही बाण सौभद्राला लागला नाही. 'रामबाण विफल होत आहेत', हा चमत्कार पाहून महर्षि विश्वामित्र थक्क झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला आणि त्यांच्या लक्षात आले की, भगवंताला स्वत:च्या वचनापेक्षा भक्ताला दिलेले वरदान पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी श्रीरामाला पण मागे घेण्यास सांगितले. हनुमानाने काशीनरेश सौभद्राला महर्षि विश्वामित्रांचे चरण धरून क्षमा मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे सौभद्रने महर्षि विश्वामित्रांची क्षमा मागितली आणि महर्षि विश्वामित्रांनी त्याला क्षमा केले.

अशा प्रकारे हनुमानाने प्रभु श्रीरामाला धर्मसंकटातून सोडवले आणि सौभद्र राजाचे रक्षणही केले. वरदान आणि पण यांच्या युद्धात वरदानाचा विजय झाला. जर एखादा रामनामाचा जप करत असेल आणि साक्षात् प्रभु श्रीरामाने त्यावर बाण चालवला, तरी त्याचे काहीही अहित होत नाही, हे या प्रसंगातून दिसून येते. भक्तशिरोमणी हनुमानाने 'रामसे बडा रामका नाम' ही म्हण सार्थ ठरवली.'

(साभार : सनातन डॉट ऑर्ग)

**– जगन घाणेकर**

# पूर्वीचे डाकूं आताचे नक्षलवादी... ?




जल, जंगल, जमिनीसाठी लढणारा आदिवासी कधी नक्षलवादी होतो हे त्याचे त्यालाही कळत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून २० वर्षे झाली तरी आदिवासींपर्यंत विकास पोहोचला नव्हता. विकासापासून ते शेकडो मैल दूर होते. देश स्वतंत्र झाला होता, मात्र स्वातंत्र्याचा लाभ काही मूठभर लोकांनाच मिळत होता. जमीनदारी प्रथा संपलेली नव्हती. परिणामी गरीबांचे, आदिवासींचे शोषण थांबलेले नव्हते. स्वातंत्र्यानंतरही ग्रामीणभागात जमीनदारी प्रथा कायम होती. मूठभर लोकांकडे हजारो एकर जमीन होती, आणि त्या जमिनीवर राबणारा भूमिहीन होता.

निर्धन होता. जमीनदारांकडून मजुरांचे प्रचंड आर्थिक, शारीरिक शोषण होत होते. राबणाऱ्या हातांना त्याच्या घामाचा दाम मिळेनासा झाला. या शोषण-अत्याचारी व्यवस्थेचा कडेलोट झाला. गरीब-आदिवासी शेतकऱ्यांनी पोलिसांकडेही दाद मागितली. तिथेही नकारघंटा. प्रशासनाचे दुर्लक्ष. या अन्यायाला उत्तर आता राजकीय सत्तेतूनच मिळू शकते हे माओवादी विचारसरणीच्या प्रभावामुळे चारू मुजुमदार यांना वाटत होते. राजकीय सत्ता ही बंदुकीच्या नळीतून येते, या तत्त्वावर त्यांचा विश्वास. लोकशाहीपेक्षा सशस्त्र क्रांतीला त्यांनी प्राधान्य दिले. कसणाऱ्याची जमीन हे आंदोलन त्यांनी पश्चिम बंगालच्या नक्षलबारी गावातून सुरू केले. त्यांच्या आंदोलनाला चळवळीचे स्वरुप येऊ लागले. नक्षलबारीतून सुरू झालेली चळवळ आंध्र प्रदेश, ओडिसा, छत्तीसगड आणि महाराष्ट्रातपर्यंत पोहोचले. २५ मे १९६७ साली नक्षलवादाची अधिकृत सुरुवात झाल्याचे मानले जाते.हा सर्व इतिहास सांगण्याचे कारण म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ रोजी भारत नक्षलवाद मुक्त झाला असल्याचा दावा केला आहे. संसदेत, सभांमध्ये घोषणा करुन खरंच नक्षलवाद संपणार आहे का? सामाजिक आर्थिक विषमेतविरोधात सुरू झालेली आदिवासींची ही खरी लढाई होती आणि आहे.

गेल्या १२ वर्षांमध्ये किती नक्षलवादी मारले, कितींनी आत्मसमर्पण केले आणि कितींना अटक झाली, या आकड्यांतून नक्षलवाद संपणारा नाही, हे शासन आणि प्रशासनाने लक्षात घेण्याची गरज आहे. अमित शहांनी सोमवारी लोकसभेत एक गोष्ट योग्यपणे सांगितली, १२ कोटी लोक गरिबीत जगत होते, याची कोणालाच पर्वा नव्हती. निरपराधांना जमिनादारांकडून मारले जात होते, दुसरीकडे शेतकरी, आदिवासींना नक्षली चळवळीकडूनही लक्ष केले जात होते. ना त्यांच्यापर्यंत विकासाची गंगा पोहोचली ना न्याय. अशा परिस्थितीत आजही हजारो आदिवासी आणि शेतकरी आहेत. त्यामुळे जमिनीवरील नक्षलवादी संपवले तरी, मनामनात धुमसत असलेली असमानतेची ज्वाला कशी विझवली जाणार आहे. त्यासाठी न्याय, समता, बंधुतेची पेरणी या भागात करावी लागणार आहे. कारखाने उभे करुन आदिवासींना जल, जंगल, जमिनीवरुन विस्थापित केले जात आहे. दुसरीकडे नक्षलवाद संपवल्याबद्दल पाठ थोपटून घेतली जात आहे. नक्षलवाद संपलाच पाहिजे, यात कोणालाही दुमत असण्याचे कारण नाही. पण जल, जंगल, जमिनीवर पहिला अधिकार कोणाचा हेही सरकारने स्पष्ट केले पाहिजे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आदिवासींपर्यंत शाळा, रुग्णालय, रोजगाराची संधी उपलब्ध होत नसेल तर हे नक्कीच सरकारचे अपयश आहे. यासाठी कोणत्याही एका सरकारला दोष देऊन चालणार नाही, तर तत्कालीन विरोधी पक्षही तेवढाच जबाबदार आहे. त्यांनी आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांचा अभ्यास न करता, फक्त नक्षली चळवळींच्या चष्म्यातूनच त्यांच्याकडे पाहिले. आजही मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पालघर या आदिवासीबहुल जिल्ह्यात रस्ते पोहोचलेले नाही. वृद्ध रुग्ण, गर्भवती महिलांना झोळीतून घेऊन जाण्याची प्रकरणे समोर येतात. सरकार जर आदिवासींपर्यंत पोहोचत नसेल तर त्यांनी काय करावे. पटसंख्या कमी झाली म्हणून शाळा बंद करणारं कोण असतं? असे अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित होऊ शकतात. महात्मा गांधींनी खेड्याकडे चला म्हटले होते. रामराज्याची कल्पना मांडली होती. मात्र आज सर्व विकास हा शहरकेंद्रित झाला आहे. खेड्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर मूठभरांचे वर्चस्व अबाधित ठेवून शहरे सूज आल्यासारखी वाढत आहेत. हा विषम विकासच विद्रोहाला जन्म देतो हे राज्यकर्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जसे सत्ता बंदुकीच्या नळीतून येऊ शकते, असे नक्षलवाद्यांना वाटत होते, तसेच गोळ्यांनी नक्षलवाद संपेल हेदेखील दिवास्वप्न ठरु नये. कारण आज मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती उद्योगपतींना दिली जात आहे. यामध्ये स्थानिकांचा वाटा काय असतो ? ज्या शेतकऱ्यांची जमीन गेली त्यांना एकरकमी पैसा दिला जातो. मात्र, त्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजुरांचे काय? त्यांच्या कुटुंबाचे काय ? शेतीवर अवलंबून असलेल्या इतर उद्योग आणि जोडधंदे यांचे जे नुकसान होणार असते त्याची भरपाई सरकार कशी करणार? असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहेत. त्यामुळे नक्षलवाद संपवल्यानंतर तिथे विकासाच्या नावाने विस्थापित होणाऱ्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी सोयी-सुविधांसह जोपर्यंत होणार नाही, तोपर्यंत कल्याणकारी राज्याची संकल्पना सत्यात उतरणार नाही, हेही राज्यकर्त्यांनी ध्यानात घेण्याची गरज आहे.

नक्षलवाद हा संपायलाच हवा, कारण नक्षलवाद्यांकडे विकासाचे कुठलेही मॉडेल नाही. नक्षलग्रस्त भागात विकासाची अडवणूकच झालेली दिसते. पूर्वीच्या डाकूंची जागा नक्षलवाद्यांनी घेतली. आता नक्षलवाद खरोखर संपला असेल तर त्याची जागा अन्य कुणी घेऊ नये, त्याचसोबत सरकारनेही गाफिल राहू नये.

# देवाच्या दारी - 'चेंगराचेंगरी आणि हाणामारी'

मंगळवार च्या मंगल दिनी बिहार मधील नालंदा येथील शीतला देवी मंदिरात देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांनी गर्दी केली मात्र याला चेंगराचेंगरीचे गालबोट लागले आणि यात भगदड होऊन आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अशा अनेक घटना यापुर्वी देखील घटना आणि याचे कारण म्हणजे गर्दीच्या ठिकाणी नियोजनाचा अभाव. एखादी दुर्घटना घडली कि चौकश्यांचा फार्स होतो, कारवाईचे इशारे दिले जातात, दोषींवर कारवाई होणारच असे राणाभिमदेवी थाटात सांगितले जाते, आणि पुन्हा एखादी दुर्घटना घडते यापलिकडे



काही होत नाही अशी आमची शासन-प्रशासन व्यवस्था आहे. गेल्या वर्षी प्रयागराज येथे कुंभमेळ्याच्या ठिकाणी तर नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर अशीच दुर्घटना घडली होती. तसेच तामिळनाडूच्या करूर येथे झालेल्या चेंगराचेंगरीत ऐकोणचाळीस जणांचा मृत्यू झाला यात काही बालके देखील आहेत आणि अनेकजण जखमी झाले आहेत. घटनेचे कारण म्हणजे विजय दलपत्ति या सिने अभिनेत्याचा राजकारणातील पदार्पण होणार होते आणि त्यावेळी गर्दीचे योग्य नियोजन झाले नाही त्यामुळे दुर्घटना घडली. बंगलोर रॉयल चॅलेंजर्स संघाच्या विजयोत्सव निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात बंगळूरु मधील घटना, ऊत्तराखंड मधील हरिद्वार येथे मन्सादेवी मंदीर दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरी होऊन सात जणांना जीव गमवावा लागल्याची घटना घडली. नेहमीप्रमाणेच मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत, जखमींवर मोफत ऊपचाराचा सोपस्कार पार पाडले जातात. बऱ्याच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात मांढरदेवी (सातारा) येथे दुर्घटना घडली होती त्यात शेकडो भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. ऐकिकडे चेंगराचेंगरी च्या दुर्घटना सातत्याने घडत असतांना दुसरीकडे भाविकांमधे धार्मिक स्थळांवरच देवी देवदेवतांच्या साक्षीनेच हाणामारी होते. चोरीच्या घटना घडणे हे तर नित्याचेच झाले आहे तसेच अशा ठिकाणी भाविकांची लुट होते. काही दिवसांपूर्वीच लोणावळ्या जवळील 'एकवीरा' देवीच्या ठिकाणी घडली. देवी च्या साक्षीनेच भाविकांच्या दोन गटांत हाणामारी झाली. विशेष म्हणजे हे दोन्ही गट देवदर्शनाला आले होते. एकवीरा देवस्थान हे आगरी, कोळी समाजाचे श्रद्धास्थान आहे वर्षभर अनेक भाविक येथे येत असतात, राज्यातील हे प्रसिद्ध देवस्थान आहे. अशावेळी भाविकांनी देखील संयम दाखवणे गरजेचे आहे, आणि वाद विवादासारखे कटु प्रसंग टाळणे गरजेचे आहे. मात्र अनेकदा भान बाळगले जात नाही आणि असे कटु प्रसंग घडतात. मात्र त्यामुळे अशी देवस्थाने नाहक चर्चेत येतात. बऱ्याच वर्षांपूर्वी याच एकविरा देवीच्या दर्शनासाठी गेलो असतांना पैसे देऊन बुट ठेवले नाही आणि एका ठिकाणी बुट ठेवले मात्र ते चोरीला गेल्याचा अनुभव मी स्वतः घेतला. कुंभमेळा असो कि जत्रा यात्रा असो, धार्मिक स्थळांवर नेहमीच गर्दी होत असते. अनेकदा गर्दी बेकाबु होते आणि दुर्घटना घडतात. नुकतीच बिहार मधे नालंदा येथे शीतला देवी या धार्मिक स्थळावर चेंगराचेंगरी ची घटना घडली आणि आठ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्र्यंबकेश्वर मंदिरात देखील अनेकदा भाविक, सुरक्षारक्षक यांच्यात वाद होतात हाणामाऱ्या होतात. अनेक धार्मिक देवस्थानी गैरप्रकार, गैरव्यवहार चालतात, भाविकांच्या भावनेशी खेळले जाते. देवस्थानावरील ट्रस्टी किती विश्वासाने काम करतात याबाबत साशंकताच आहे, काही देवस्थान खाजगी आहेत तर काहींवर सरकार कडुन नियुक्ती होतात त्यातही राजकारण चालते. या सगळ्या पार्श्वभूमीवर विदर्भातील शेगांव येथील गजानन महाराज मंदिराचे व्यवस्थापन आणि कारभार ऊठुन दिसतो.

दुर्घटना अपघाताने घडत असली तरी वादविवाद, हाणामारी टाळणे भाविकांच्या हाती आहे. अगदी क्षुल्लक कारणावरून ठिणगी पडली आणि त्याचे पर्यावसान हाणामारीत झाले. मात्र या सगळ्यांत दोन्ही गटांनी काय मिळवले?. असे प्रसंग टाळले गेले पाहिजेत. देवाचिये द्वारी हवी श्रद्धा आणि सबुरी, संयम. अशा प्रकारांमुळे, घटनांमुळे धार्मिकतेला तडा जातो त्याच बरोबर पावित्र्य देखील राखले जात नाही.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## हेर हनुमान

मारुती गुण समुच्चय
उल्लेख पद्मपुराणात
पुरातन पत्रकार जणूं
आपण राही ऋणात

सागर लंघून पोचला
लंका नगरीत क्षणात
निर्भय रामदूत खास
सामर्थ्य दावी रणात

उत्कृष्ट बातमीदार तो
असे गुप्तहेर साक्षात
लंका माहीत इत्यंभूत
कणकण असे लक्षात

सूक्ष्म रुप धारण करी
फिरला मुक्तते जनात
शोधून काढले सीतेला
शोकाग्र अशोकवनात

मोठी करुन शेपटीला
बैसला उच्चआसनात
युध्दपूर्व संधीची संधी
संदेश दिलासन्मानात

लंकादहन करे सावध
डंका वाजवी नगरात
खडान् खडा माहिती
जमा करी खबरबात

मारुतीचे अमूल्य असे
योगदान सार्थ अर्थात्
विमानअर्चनाकल्पात
दाखला मिळे ग्रंथात

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# मुलांना पोहायला शिकवताय....जरा जपून...

मागील काही वर्षांपेक्षा यंदा उन्हाळ्यातील उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते आहे. सकाळी दहा नंतर उन्हाचे चटके बसू लागल्याने अंगाची लाहीलाही होत आहे अशातच शाळांना उन्हाळी सुट्टी पडली आहे. त्यामुळे मुले घरातच आहेत. याच संधीचा फायदा घेऊन पालक आपल्या पाल्यांना पोहायला शिकविणेसाठी नदी, विहीर, तलाव या ठिकाणी घेवून जात आहेत. यामध्ये लहान मुलेसुद्धा पोहायला जात आहेत. नदी - विहिरीवर मुलांची गर्दी असल्यामुळे कोण कुठे पोहत आहेत हे समजत नसल्याने अडचणीचे ठरू शकते मुलांना पोहायला शिकवून झाल्यानंतर पालक अंघोळ करत असतात याच संधीचा



फायदा घेऊन मुले नदी, विहीर, तलाव याकडे डोकावून पाहणे, दगड मारणे यासारखे खेळ खेळत असतात. मात्र हाच खेळ जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही लहान मुलांना नदी, विहीर अथवा तलावामधील पाण्याचा अंदाज येत नसल्याने मुले पाण्यामध्ये बुडण्याची शक्यता असते. अनेक ठिकाणी पोहायला गेल्यावर मुले पाण्यात बुडून मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मुलांच्या जीवनामध्ये पोहायला शिकणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठीच पालक प्रयत्न करत असतात. मात्र, लहान मुलांना पाण्याचा अंदाज लागत नसल्याने अथवा त्याची माहिती नसल्याने अशा दुर्दैवी घटना घडतात. त्यासाठी पालकांनी जबाबदारीने, आपण अंघोळ करताना लक्ष ठेवून पोहायला शिकवले पाहिजे तरच अशा घटनांना आळा बसेल.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व टपरीवर होणार कारवाई

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, ठाणे :** ठाण्यात पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व चहा टपरीवर दंडात्मक कारवाई करण्याचे ठाणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने आदेश काढले आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांच्या तक्रारीनंतर ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग समित्यांच्या सहायक आयुक्तांना परिपत्रकाद्वारे हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. ठाणे महानगरपालिका यांनी शहरातील हॉटेल्स व चहा स्टॉल्समध्ये चहा पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेपर कपविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांनी केलेल्या तक्रारीनंतर महापालिकेने याची गंभीर दखल घेतली आहे. शहरातील अनेक ठिकाणी चहा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पेपर कपचा वापर होत असून, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. अशा कपमधील रसायनांमुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा मुद्दा अत्यंत गंभीर मानला जात आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर कारवाई करून दंड आकारला जाणार आहे.

## माजी आमदार भोईर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा संपन्न



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली नेकनीपाडा येथे माजी आमदार सुभाष भोईर यांच्या नवीन लोकसेवा कार्यालयाचा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याचे उद्घाटन रविंद्र चव्हाण (प्रदेशाध्यक्ष भाजप, आमदार डोंबिवली विधानसभा) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या अवसरावर आमदार निरंजन डावखरे, सुलभाताई गणपत गायकवाड, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, जिल्हाध्यक्ष नंदू परब, ठाणे शहर उपाध्यक्ष रमेश आंब्रे, उपमहापौर राहुल दामले, गटनेते शशिकांत कांबळे, नगरसेवक महेश पाटील, नगरसेविका वेदिका पाटील, जेष्ठ नेते सदानंद थरवळ, संतोष केणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जनसंपर्काच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्वांचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## पत्रकारांसाठी आनंदवार्ता; ठाण्यात म्हाडाकडून घर वाटप प्रक्रियेला वेग




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, ठाणे :** पत्रकारांसाठी राखीव कोट्यातून घर वाटप प्रक्रियेला गती मिळत असून वरिष्ठ पत्रकार धर्मेंद्र उपाध्याय यांना म्हाडा कोकण गृहनिमर्ण मंडळाकडून घराचा ताबा देण्यात आला. म्हाडाचे कोकण विभागाचे मुख्य अधिकारी डॉ.विशाल राठोड यांच्या हस्ते त्यांना अधिकृत पत्र तसेच घराच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. ठाणे येथे झालेल्या या सोहळ्यात पत्रकार कोट्याअंतर्गत हे घर देण्यात आले. यावेळी वकील विनय कुमार सिंह, तसेच 'दैनिक लोकपरिवार समाचार'चे मालक, प्रकाशक व संपादक सुदाम खारकर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांसाठी राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांचे कौतुक केले. पत्रकारांना सुरक्षित व स्थिर निवास मिळावा. यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व म्हाडा अधोरेखित करण्यात आले. म्हाडाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे पत्रकारांना दिलासा मिळत असून भविष्यात अधिकाधिक पात्र पत्रकारांना याचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## ढोकेश्वर महाविद्यालयात माजी विद्यार्थी - पालक मेळावा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थी व पालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ.लक्ष्मण मतकर यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. ह.भ.प बाबा महराज शिंदे ह.भ.प प्रसाद महाराज खिलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या सभागृहात हा मेळावा झाला. प्रास्ताविकात प्राध्यापक लक्ष्मण कोठावळे यांनी मेळाव्याचा हेतू स्पष्ट करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेऊन माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगितले. यावेळी गमविस्तार अधिकारी संपत दातीर श्रावण गायकवाड बाबा मंचरे विलास ठुबे प्राथमिक शिक्षिका संध्या घोलप यांच्या सह पालक व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सिताराम खिलारी यावेळी बोलताना म्हणाले की, पालक आणि माजी विद्यार्थी यांच्या सहयोगा तुन महाविद्यालयाची प्रगती सहज होईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाने ज्ञानाचे भांडार खुले करून दिले. यावेळी बोलताना बाबासाहेब शिंदे यांनी सांगितले की, या महाविद्यालयाने आमच्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला सामाजिक काम करण्याचे बाळकडू मिळाले. प्राचार्य लक्ष्मण मतकर यांनी पालक आणि विद्यार्थी सहयोगातुन महाविद्यालयाची प्रगती साधता आली. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य महत्वाचे असल्याचे सांगितले. प्रा.डॉ.जिजाभाऊ घुले यांनी सुत्रसंचलन केले. तर उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी यांनी आभार मानले.

# ७३व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता मुंबई उपनगर संघ जाहीर

## अक्षय बर्डे, यशिका पुजारी यांच्याकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०१, मुंबई :** मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असो. ने ७३व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता आपले पुरुष व महिला संघ जाहीर केले. स्वस्तिक क्रिडा मंडळाच्या अक्षय बर्डे कडे पुरुष,तर स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या यशिका पुजारीकडे महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली.

निवडण्यात आलेले संघ खालील प्रमाणे :- पुरुष संघ :- १) अक्षय बर्डे(संघनायक) २) हर्ष जाधव ३) रजत सिंग ४) अलंकार पाटील ५) शुभम दीडवाघ ६) शिवांश गुप्ता ७) अक्षय तावडे ८) दिनेश यादव ९) जतिन गोरुले १०) प्रशांत पवार ११) आकाश अरसुल १२) सोहम भोसले १३) संजित पंडित १४) आकाश होजागे

संघप्रशिक्षक :- कमलेश पालव

संघ व्यवस्थापक :- मनोज मोकल

महिला संघ :- १) यशिका पुजारी (संघनायिका) २) समृध्दी मोहिते ३) कोमल देवकर ४) प्रणाली नागदेवते ५) सानिका पाटील ६) रिया निंबाळकर ७) स्नेहल चिंदरकर ८) प्रसिता पान्हळकर ९) करीना कामटेकर १०) राधिका जाधव ११) सेजल पेडामकर १२) दीक्षा त्रिवाडकर १३) गायत्री देवळेकर १४) प्राची तावडे

संघप्रशिक्षक :- अमित ताम्हाणेकर

संघ व्यवस्थापिक :- राजेंद्र अनभवने

मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने संघाला हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# माथेरान मिनी बस सेवेची दुरावस्था घाटातील कठीण वळण रस्त्यामुळे प्रवाशांचे हाल




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान :** जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये आजही मूलभूत सुविधांच्या अभावामुळे स्थानिक नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः वाहतुकीच्या प्रश्नाने गेल्या अनेक वर्षांपासून गंभीर रूप धारण केले असून, मिनीबस ही सेवा आता स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

कर्जत – नेरळ मार्गे सुरू असलेली मिनीबस सेवा सुरुवातीला नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरली होती. मात्र, कालांतराने हीच सेवा जीर्ण आणि अविश्वसनीय बनली आहे. घाटातील तीव्र चढ-उतार आणि अरुंद वळणांमुळे बस चालवणे हे चालकांसाठी मोठे आव्हान बनले आहे. परिणामी, वारंवार होणारे तांत्रिक बिघाड आणि घाटातच बस बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. या समस्येमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा प्रवाशांना अर्ध्या रस्त्यात उतरून पायपीट करावी लागते किंवा अधिक पैसे मोजून खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. विद्यार्थ्यांपासून व्यापाऱ्या पर्यंत सर्वच घटक यामुळे त्रस्त झाले आहेत.

विशेष म्हणजे, ही समस्या नवीन नसून गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. तरीही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. २ वर्षांपूर्वी नवीन बसेस देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र ते अद्याप पूर्ण झालेले नाही. स्थानिकांच्या मते, माथेरान घाटाचा कठीण आणि धोकादायक रस्ता हेच या सेवेचे मुख्य दुखणं आहे. अशा परिस्थितीत जीर्ण मिनीबस चालवणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देण्यासारखे असल्याचे ही सांगितले जात आहे.म्हणूनच, केवळ आश्वासने न देता प्रशासनाने तातडीने नवीन, सक्षम मिनीबसेस उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अन्यथा, भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल संतप्त माथेरानकरांकडून उपस्थित केला जात आहे.

# लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे; पानेड - फणसवाडी रस्त्याला नवा वेग



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०१, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील पानेड ते फणसवाडी या रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात छेडण्यात आलेल्या आंदोलनास अखेर तूर्तास स्थगिती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री – मुख्यमंत्री सडक योजनेच्या अलिबाग कार्यालयाचे उपअभियंता आर.के. चव्हाण यांनी लेखी पत्र देत येत्या दोन दिवसांत रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलनं मागे घेण्याचा निर्णय घेतला.

पानेड ते फणसवाडी हा सुमारे ९.५ किलोमीटर लांबीचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता असून, या कामासाठी सुमारे १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२५ पासून या रस्त्याचे काम सुरू असले तरी अद्याप काम पूर्ण झालेले नाही. रस्त्याच्या बाजूची संरक्षण भिंत, मोऱ्या, पुलाचे काम तसेच कॉंक्रीटीकरणाचे काम अपूर्णच असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सध्या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून धुळीमुळे प्रवाशांच्या डोळ्यांना त्रास होत आहे.

या समस्यांकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे, या मागणीसाठी सत्यशोधक सर्वोदय संघटनेच्या वतीने ०१ एप्रिल २०२६ रोजी पेण – खोपोली मर्गावरील हेटवणे कॉलनी येथे 'सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह' आंदोलन छेडण्यात आले होते.

आंदोलन स्थळी उपअभियंता आर. के. चव्हाण यांनी भेट देऊन लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलनास तूर्तास स्थगिती दिली. या आंदोलनावेळी, ललित पाटील, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, ज्युनियर इंजिनियर शुभम चौधरी, पेण वनपरिक्षेत्र अधिकारी सपना सोनार, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी किरण जुईकर, वाकरूळचे सरपंच गणेश गायकर, पोलीस पाटील केशव पाटील, ॲड. रोशन पाटील तसेच शेकडो आंदोलक कर्ते मोठ्या संख्येने आंदोलन स्थळी उपस्थित होते.

ज्या भागात वनविभागाची जमीन आहे, त्या ठिकाणी सुरू असलेले मोऱ्यांचे व रस्त्याचे काम वनविभागाच्या हद्दीत येते. आवश्यक परवानगी नसल्याने आमच्या कर्मचाऱ्यांनी ते काम थांबवले होते . संबंधित ठेकेदाराला सुमारे ३ ते ४ महिन्यांपूर्वीच वनविभागाची परवानगी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, मात्र अद्याप परवानगीसाठी कोणताही प्रस्ताव आमच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. ज्या ठिकाणी रस्ता व मोऱ्यांचे काम प्रस्तावित आहे, त्या सर्व ठिकाणांसाठी आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमानुसार प्रस्ताव सादर झाल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती परवानगी निश्चितच दिली जाईल.

**- सपना सोनार (वनपरिक्षेत्र अधिकारी, पेण)**

---

गेल्या दोन वर्षांपासून पानेड – फणसवाडी रस्त्याचे काम सुरू असूनही ते अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आज हेटवणे कॉलनीजवळ 'सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह' आंदोलन करण्यात आले होते. मात्र आंदोलनस्थळी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे उपअभियंता यांनी भेट देऊन येत्या दोन दिवसांत रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तूर्तास मागे घेण्यात आले. तथापि, दोन दिवसांत काम सुरू न झाल्यास यापेक्षा अधिक उग्र आंदोलन छेडण्यात येईल.

**- संदीप पाटील (आंदोलनकर्ते)**

# शारीरिक शिक्षण शिक्षकांनी घेतली शिक्षण समिती अध्यक्षांची भेट



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.३१, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या वेतन विसंगतीचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये सदर शिक्षकांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांचा ४ हजार ३००/ रुपये ग्रेड पे न देता त्यांना २८००/-रुपये ग्रेड पे दिला गेला. त्यामुळे शारीरिक शिक्षण शिक्षकांवर प्रशासनाकडून अन्याय झाला आहे.

याबाबत सर्व शारीरिक शिक्षण शिक्षकांनी मनपा प्रशासनाकडे ४३००/-रुपये ग्रेड पे मिळावा यासाठी मागणी केली,परंतु प्रशासनाने त्यावर आजपर्यंत काहीही ठोस उत्तर दिले नव्हते. फक्त भाषा, गणित, विज्ञान सामाजिक शास्त्रे विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनाच सदर ग्रेड पे अनुदेय आहे. असे शासनाच्या परिपत्रकात दिले गेले आहे. त्यामुळे सदर शारीरिक शिक्षण शिक्षकांना हा ग्रेड पे देण्यात आला नव्हता. याबद्दल शारीरिक शिक्षण शिक्षकांनी आपल्या युनिट मार्फत पे रिविजन कमिशन समोर आपली व्यथा मांडली. यावर मुंबई महानगरपालिकेच्या पे रिव्हीजन कमिशन यांनी सादर केलेल्या वेतन विसंगती अहवालामध्ये याबाबत प्रशासनाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा. असे नमूद केले होते. परंतु गेली ८ वर्षे कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी शिक्षण समिती अध्यक्ष वा महापौर असे पदाधिकारी अस्तित्वात नव्हते. नुकत्याच महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या अन नगरसेवक ते महापौर सर्व पदाधिकारी अस्तित्वात आले. त्यानुसार सदर वेतन विसंगतीची बाब शा.शि.शिक्षक युनिटने शिक्षण समिती अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी शिक्षण समितीच्या दालनात मनपाचे शिक्षणाधिकारी व शारीरिक शिक्षण शिक्षक युनिटचे पदाधिकारी यांना एकत्रित चर्चेसाठी निमंत्रित केले.

मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त्य संस्था असून शारीरिक शिक्षण शिक्षकांची पदे ही आपणच निर्माण केलेली आहेत. आपणच नेमलेले शारीरिक शिक्षण शिक्षक आहेत. त्यामुळे त्यांना हा ग्रेड पे देणे योग्य आहे. असं शिक्षण समिती अध्यक्षांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले व तसा प्रस्ताव तयार करण्यास शिक्षणाधिकारी यांना सांगितले. त्यानुसार शिक्षणाधिकारी यांनी सदर प्रस्ताव तात्काळ तयार करून सादर करतो असे सांगितले. त्यामुळे बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सदर चर्चेमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कीर्तीवर्धन किरतकुडवे, उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) मुख्तार शाह, शारीरिक शिक्षण शिक्षक युनिटचे प्रमुख कार्यवाह डॉ.जितेंद्र लिंबकर,प्रशांत देऊलकर, संदीप येंदे, अनिल सनेर, केशव बोरकर, चंद्रकांत घोडेराव, श्रद्धा जाधव, सुषमा ठाकूर हे उपस्थित होते. नगरसेवक महादेव शिवगण यांच्या माध्यमातून या चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

# डहाणूच्या प्रसिद्ध महालक्ष्मी यात्रेस प्रारंभ; १५ दिवस चालणार यात्रा

## आजपासून यात्रा सुरू; पालघर जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०१, पालघर :** पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील चारोटी जवळ मुंबई-अहमदाबाद म हामार्गालगत विवळवेढे येथे श्री महालक्ष्मी देवीचे मंदिर आहे. हे जागृत देवस्थान मानले जात असून ही देवी नवसाला पावते असा लाखो भाविकांचा विश्वास आहे. ठाणे, पालघर, नाशिक जिल्ह्यातील भाविकांबरोबर गुजरात मधील भाविक येथे मोठ्या प्रमाणात येतात. सुरत मधील भाविकांची ही या देवीवर विशेष श्रद्धा आहे. २ एप्रिल पासून देवीची यात्रा सुरू होत असून पंधरा दिवस चालणाऱ्या यात्रेसाठी भाविकांना सोयी सुविधा व सुरक्षिततेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. वर्षभरात या देवीचे बारसी, नवरात्र, यात्रा आदी निरनिराळे उत्सव होतात. चैत्र महिन्याच्या पौर्णिमेपासून पंधरा दिवसाची यात्रा भरते हे येथील मुख्य आकर्षण असून यात्रेत ठाणे, पालघर, नाशिक जिल्ह्यातून व गुजरात राज्यातून लाखो भाविक येतात पालघर जिल्ह्यातील ही सर्वात मोठी यात्रा आहे. या यात्रेदरम्यान चैत्र पौर्णिमेला पहिला होम व त्यानंतर अष्टमीला दुसरा होम असतो. देवीवर आदिवासी समाजाची मोठी श्रद्धा असून आदिवासी समाजा बरोबरच कुणबी, मांगेला, गुजराती आदी सम ाजाचे भाविक देवीला आपली कुलस्वामीनी म ानतात. मंदिरात पुजारी हे आदिवासी समाजाचे असून ते श्रद्धेने देवीची पूजा करतात. महालक्ष्मी मातेच्या अनेक आख्यायिका आहेत.

### महालक्ष्मी डहाणूला कशी स्थायिक झाली ?

कोल्हापूरच्या महालक्ष्मीला गुजरातमध्ये वास्तव्य करण्याची इच्छा झाली. वाटेने जाताना घनदाट जंगले, डोंगरदऱ्या पार करून गुजरातला जाणे सोपे नव्हते. राक्षसांशी गाठ केव्हा पडेल आणि कसा प्रसंग उद्भवेल याचा भरोसा नव्हता. एवढं सर्व माहीत असूनसुद्धा महालक्ष्मी प्रवासास निघाली. महालक्ष्मीचा प्रवास ज्या परिसरातून होई तो भाग मंगल, पवित्र होत असे, विवळवेढे या गावाजवळील जंगलातून महालक्ष्मी जात असताना, त्या भागातील परिसरात बदल झाला. वातावरण पवित्र होऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून त्या भागातील राक्षसाला जाग आली. तो खडबडून उठला. महालक्ष्मीला आपल्या परिसरात पाहून त्याचे डोळे क्रोधाने लाल झाले. प्रवास करणाऱ्या महालक्ष्मीसमोर तो राक्षस उभा राहिला. शेवटी महालक्ष्मीने आपले खरे रूप प्रकट केले व राक्षसाला त्रिशूळाने ठार मारले. राक्षसांशी युद्ध करून देवी दमली होती. तिला विश्रांतीची गरज भासू लागली. विश्रांतीसाठी योग्य जागा पाहू लागली. तिची नजर जवळच्या डोंगरम ाथ्यावर गेली. हेच डोंगराचे शिखर आपल्याला विश्रांतीसाठी योग्य आहे, असे तिला वाटले आणि महालक्ष्मी शिखरावर आली. निसर्गाच्या सानिध्यातदेवीने राहावयाचे ठरवले. पुढे तिला एकटीला कंटाळा आला. भक्तांची आवश्यकता वाटू लागल्याने येथील कान्हा ठाकूर नावाच्या म ाणसास देवीने स्वप्नात जाऊन दृष्टांत दिला आणि आपली पूजा करण्यास सांगितले. कान्हा ठाकूर रोज देवीची डोंगरावर जाऊन पूजा करू लागला आणि महालक्ष्मी डहाणूला स्थायिक झाली.

### देवीचे स्थान शिखरावर मंदिर पायथ्याशी ?

देवीचे स्थान शिखरावर आहे. परंतु मंदिर पायथ्याशी कसे ? असा प्रश्न सर्वांना पडतो. याबाबत अशी आख्यायिका सांगितली जाते की, पूर्वी एक आदिवासी गरोदर स्त्री वार्षिक यात्रेच्या वेळी दर्शनाला नियमाप्रमाणे शिखरावर जात असताना तिच्या पोटात कळा येऊ लागल्या. तिला पुढे जाणे अशक्य झाले. आता देवीचे दर्शन घेता येणार नाही. म्हणून तिने मातेची प्रार्थना केली. तिची प्रार्थना देवीने ऐकली. त्यावेळी दृष्टांतात देवीने तिला सांगितले की पायथ्यापाशी मी आहे. तेथे दर्शनाला ये. बेशुध्द होऊन पडलेली आदिवासी स्त्री खडबडून जागी झाली आणि पायथ्याजवळ येताच तिला महालक्ष्मी देवीने दर्शन दिले. पुढे या ठिकाणी मंदिर उभारले गेले.

### डोंगराच्या सुळक्यावर ध्वज लावणे

डोंगराच्या सुळक्यावर झेंडा लावणे हे एक दिव्य समजले जाते. देवीच्या डोंगरावरील मूळ स्थानावर चढून पूजा करणे व १४०० फूट उंचावर ध्वज लावण्याचा कार्यक्रम प्रतिवर्षी चैत्र शुध्द पौर्णिमेच्या मध्यरात्री केला जातो. हे काम वाघाडी येथील सातवी कुटुंब करीत आले आहेत. हा ध्वज घेऊन जाणारा पुजारी एक महिना मांस, म च्छी, दारू सेवन करीत नाही व ब्रम्हचर्य पाळतो. जव्हारच्या मुकणे राजघराण्याकडून अनेक वर्षापासून पाच मीटर लांब ध्वज, साडी, चोळी व पूजेचे साहित्य दिले जाते.

चैत्र शुध्द पौर्णिमेला मध्यरात्री १२ वाजता पुजारी ध्वज, पूजेचे साहित्य व देवीची ओटी भरण्यासाठी १२ नारळ बरोबर घेऊन पायथ्याच्या मंदिरापासून अतिशय वेगाने धावत निघतो. त्यावेळी त्याच्या अंगात देवी संचारलेली असते. हे दृश्य पाहण्यासाठी असंख्य भाविक मार्गात बसलेले असतात. ध्वज लावण्याचे ठिकाण देवीच्या पूजेच्या डोंगरावरील स्थानापासून ६०० फूट उंचावर आहे. तेथे अनेक वर्षापासून ज्याच्या अंगांत देवी संचारते तोच इसम चढतो. रात्री १२ वाजता निघालेला पुजारी तीन मैल चढणीचा रस्ता कापून सुमारे ३ वाजता डोंगरावर चढतो. तेथे तुपाचा दिवा लावून ध्वज फडकावतो आणि सकाळी ७ वाजता परत येतो. परंतु पायथ्याच्या मंदिरातून निघाल्या वेळेपासून परत येईपर्यंतच्या मधल्या काळात काय घडते हे स्वतः पुजारीही सांगू शकत नाही. ध्वज लावण्यासाठी जो खांब असतो, तो सागाचा असून दर ५ वर्षांनी बदलावा लागतो. या देवीच्या डोंगरावरील स्थानावर जाण्यासाठी दोनशे फूट भुयारातून जावे लागते. या उंच ठिकाणी पाण्याचा झरा व कुंड आहे. येथील पाणी कधीच कमी होत नाही.

या मंदिराचा पुजारी आदिवासी असण्याचे कारण की, पेशवाईच्या काळात येथील सातवी कुटुंबातील कान्हा ठाकूर या आदिवासीच्या स्वप्नात महालक्ष्मी देवी आली. तिने मी मुसल्या डोंगरावर असल्याचे सांगितले. तेव्हापासून देवीच्या पूजेचे काम सातवी कुटुंबाकडे आहे. प्रतिवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून सातवी कुटुंबातील नवीन पुजारी पुजेचे काम स्वीकारतो. तो एक वर्ष पूजा सांभाळतो. आदिवासी या देवीला आपले कुलदैवत मानतात.

### महालक्ष्मी देवीची यात्रा

महालक्ष्मीची यात्रा चैत्र महिन्याच्या पौर्णिम ेपासून कृष्ण पक्षातील अष्टमीपर्यंत मंदिराच्या सभोवती असलेल्या मैदानात भरते. मंदिराच्या जवळून महामार्ग जात असल्यामुळे वस्ती वाढली आहे. सूरत, मुंबई मधील लाखो भाविक येथे येतात. मंदिराच्या प्रवेशद्वारावर एक ध्वजस्तंभ असून त्यावर एक मोठा ध्वज फडकत असतो. दसऱ्याला जुना ध्वज काढून त्याजागी नवीन ध्वज लावला जातो. यात्रेच्या वेळी ध्वजस्तंभाची बळी देऊन त्याची पूजा करतात. नंतर देवीची पूजा केली जाते. मंदिराच्या समोर दोन दीपमाळा असून त्यांच्या मध्ये एक मुख्य होमकुंड आहे व दोन्ही बाजूला दोन होमकुंड आहेत. यात्रेमध्ये शेकडो दुकाने वेगवेगळ्या वस्तूंनी सजलेली असतात. यात्रेत येणाऱ्या भाविकांच्या मनोरंजनासाठी सर्कस, जादूचे प्रयोग, पाळणे असतात. यात्रेच्या निमित्ताने काही नवदांपत्य नवस फेडण्याच्या उद्देशाने, काहीजण मुलांचे जावळ करण्यासाठी येतात. सूरतमधील लोकांची या देवीवर मोठी श्रध्दा आहे. त्यामुळे ही देवी सुरती लोकांची म्हणून प्रसिध्द आहे.

### बारसी

भाद्रपद महिन्यात भात पिकल्यावर बारस हा दुसरा उत्सव साजरा केला जातो, संपर्ण पावसाळा आदिवासी शेतकरी बांधव नवीन पावसाने उगवलेले धान्य, भाज्या, प्राशन करत नाहीत. सर्वप्रथम महालक्ष्मी मातेला अर्पण करण्याची प्रथा आहे. त्यावेळी आजूबाजूच्या गावातील आदिवासी पारंपारिक वाद्य घेऊन भाद्रपद वद्य द्वादशीच्या दिवशी पायी चालत महालक्ष्मी देवीच्या दर्शनाला येतात. भाद्रपदाची द्वादशी म्हणजे बारशी. नवीन पीक आल्यामुळे या यात्रेला लोक बारशी म्हणून ओळखतात. हा आदिवासी शब्दप्रयोग आहे. देवीचे दर्शन घेऊन तिचा आशिर्वाद घेतात. बारशीच्या रात्री मंदिराच्या आवारात तारप्याच्या सुरावर तालबद्ध नृत्य केले जाते.

### ऐतिहासिक नोंद

अकबर बादशहाच्या वेळी राजा तोरडमल येथे आला होता. त्याने देवीचे दर्शन घेतले होते. अशी इतिहासात नोंद आहे. तसेच पंजाबचा राजा रणजित सिंह याने पंजाब सर केल्यावर देवीची महापूजा करून मंदिरावर सोन्याचा कळस चढवला होता.

### महालक्ष्मी मंदिरात साजरे केले जाणारे वार्षिक उत्सव

कोळीचा शेंदूर, पितर बारस, नव्याचा शेंदूर, नवरात्र उत्सव, दसरा, वाघ बारस, माही बारस, होळीचा शेंदूर, यात्रा उत्सव

### महालक्ष्मी यात्रे पर्यंत कसे पोहचाल...

मुंबई अहमदाबाद महामार्गालगत विवळवेढे येथे महालक्ष्मी देवीचे मंदिर आहे. डहाणूत रेल्वेने पोहचल्यास डहाणू बस आगारातून यात्रा स्पेशल बसेस असतात. तसेच तारपा चौक (सागर नाका) येथून रिक्षा सेवा उपलब्ध आहे.

### यात्रेला लाखो भाविकांची गर्दी, व्यापारी दुकानदारांनी दुकाने थाटली...

महालक्ष्मी (विवळवेढे ) या यात्रेला लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. मुंबई -अहम दाबाद राष्ट्रीय महामार्ग लगत विवळवेढे गावात मातेचे मंदिर असल्याने मुंबई हुन गुजरात तसेच गुजरात हुन मुंबई कडे जाणारे भावीक मातेच्या दर्शनाला येतात. भाविकांना येथे येण्यासाठी अनेक वाहने उपलब्ध असतात. त्यामुळे यात्रे दरम्यान भाविकांची मोठी गर्दी असते. यात्रे निमित्ताने ठाणे, वसई, पालघर, सुरत, वापी आदी भागातील मोठ्या प्रमाणात व्यापारी यात्रेत आपली दुकानें थाटत आहेत.यामध्ये शेतीची अवजारे, कांदा, लसूण, सुकी मच्छि, भांडी, चिकन, मटण, लहान मुलांची खेळणी, विविध खाद्य पदार्थ आदी ची दुकाने मोठ्या संख्येने असतात.

### यात्रेत विविध करमणूकीची साधने, तसेच साहशी खेळ...

यात्रेला लाखो भावीक येत असल्याने अनेक व्यापारी नागरिकांसाठी करमणूकीचे मोठ मोठे आकाश पाळणे, झूले, सर्कस, मौत का कुवा,सुनामी, कावड, ड्रेगन, फिरत पाळणा आदी प्रकार आहेत. यामध्ये मौत का कुवा तसेच आकाश चुंबी पाळणा यामध्ये मोठ्या संख्येने नागरिक आनंद घेत असतात.

## माणूसकी फॉउंडेशन तर्फे जागतिक महिलांदिनानिमित्त पुरस्कार देण्याचा कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.३१, मिरा भाईंदर :** माणूसकी फाउंडेशन तर्फे जागतिक महिला दिनानिमि त्त नुकताच सायं ४ वा. विरार पूर्व वसई विरार महानगरपालिका वाचनालय हॉल मध्ये समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना पुरस्कार देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. महिला अध्यक्ष रजनी गडा ह्यांच्या अध्यक्षते खाली कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी कार्यक्रम मुलांच्या १० वी १२ वी च्या बोर्ड परीक्षा असल्याम ुळे ८ मार्च ऐवजी आज कार्यक्रम करीत आहोत असे स्पष्टीकरण दिले.फॉउंडेशन च्या सह चिटणीस तहसीन चिंचोलकर ह्यांनी प्रस्तावना केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौंडेशन च्या सचिव ज्योती ताई तांबे ह्यांनी केले.- प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ती रामेश्वरी शिंदे, अमृता सावंत, मनीषा खिलारे, ऍड. किरण म्हात्रे (कार्याध्यक्ष माणूसकी फॉउंडेशन) डॉ.शर्मा, सुषमा अहिर, मोहनी आंबोकर (नालासोपारा विभाग प्रमुख शिवसेना उबाठा) उपस्थित होत्या.- ज्या ज्या महिलांना पुरस्कार मिळाला त्याची नावे अमृता सावंत, रामेश्ववरी शिंदे, रिया पवार, सुषमा अहिरे, डॉ शशिकला शर्मा, शुभांगी राऊत, हिमा परमार, दीपिका संदेश, दीपा सिंग (अँकर आपका शहर ) सोनल ठाकूर, विजया जोशी, कृतिका पठारे - मोरे, सिम्मी लोखंडे, वैशाली बोखारे, प्रतिज्ञा जाधव, नजमा खान, सुलभा राठोड, सायली परब, मनीषा गुरव, संध्या गायकवाड, मोहिनी आंबोकर ह्यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी पुरस्कार देण्यात आले व त्यांनी आपली माहिती व कार्याची माहिती सभेला दिली. माणूसकी फॉउंडेशन चे सचिव ह्यांनी आपल्या प्रभोधन भाषणात महिलांना अंधश्रद्धे पासून दूर रहा व मा जिजाऊ,सावित्रीबाई फुले, रमाई चा आदर्श डोळ्यासमोर ठेवा. आपण कोणत्याही बुवा बाजी करणाऱ्या कडे जाऊ नये. जीवनात अनेक चढ उतार येतात खचून जाऊ नका. कठीण वेळेस वेळ द्या सर्व शांत होईल. अंतः बुद्ध ची शिकवण आठवणीत ठेवा. अप दीपो भव. आता आपल्याला बुवा तिथे बाया हि म्हण पुसायची आहे. अध्यक्ष व अक्षराज चे पत्रकार घनश्याम आंबोकरजीने महिलांना महिला दिनांच्या शुभेच्छा दिल्या व स्वतः मजबूत राहण्याचा सल्ला दिला. कोणताही वाईट दिवस फार काळ टिकत नाही पुन्हा चांगले दिवस येतात हि खात्री बाळगा. मा जिजाऊ, मा सावित्रीबाई, रमाई ना अठवा. त्यांची धेर्यता कायम आठवा. राजेश ने सांगितल्या प्रमाणे बुवा तिथे बाया हे वाक्यच आपल्या कृती तुन फुसायचे आहे. श्रद्धा असणे चुकीचे नाही अंध श्रद्धा ठेवणे चुकीचे व वैज्ञानिक दृष्टी असणे गरजेचे आहे. कार्यक्रम ला माणूसकी फॉउंडेशन अध्यक्ष घनश्याम आंबोकर, सचिव राजेश जाधव उपाध्यक्ष विजय काकडे,खजिनदार विजय गोडबोले, मैत्रि संस्थे चे अध्यक्ष सुरज भोईर ओबीसी नेते संतोष आंबेकर, सुभाष आंबोकर, सुभाष जाधव, राजेश मोरे,प्रमोद जाधव,ओ पी सिंग आपका शहर संपादक, जेष्ठ गुजराती पत्रकार जितेश वोरा, साप्ताहिक प्रसिद्ध लेखनी के संपादक शेषनाथ यादव आणि अन्य उपस्थित होते. कार्यक्रम छान झाला कार्यक्रमास महिलांनी भरपूर प्रमाणात उपस्थिती दाखवली व कार्यक्रम यशस्वी केला. महिला अध्यक्ष रजनी गडा नी सर्वांची आभार मानून आमच्या संस्थेचे सभासद व्हा असे अहवान केली.

## गोंदेडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०१, चिमूर (चंद्रपूर) :** महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिम ुख,कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी १ एप्रिल ला गोंदेडा येथील तपोभुमीतील सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार श्रीधर राजमाने उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार सुर्यकांत पाटील, भूमी अभिलेख उपअधीक्षक कावळे, पुरवठा निरीक्षक वानखेडे,विस्तार अधिकारी प्रवीण भुसारी, गुंफा सम ीतीचे सचिव चंद्रभान शेंडे, प्रशासक गिरजाबाई गायकवाड,सांधना डांगे, मंडळ अधिकारी चिंडे, गेडाम इत्यादी उपस्थित होते.यावेळी आधार कार्ड, संजय गांधी योजना प्रमाणपत्र, अधिवास, जात, उत्पन्न, राशन कार्ड, विविध दाखले तसेच इतर विभागांच्या लाभार्थ्यांना शासकीय योजना विषयक लाभाचे वाटप करण्यात आले. यावेळी विविध विभागांचे टेबल लावण्यात आले यात आरोग्य विभागाकडून आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य विभागांचे डॉ.महेश मंगर, हांडेकर, उज्वला रामटेके, मेश्राम इतर कर्मचारी उपस्थित होते. भूमी अभिलेख विभागाकडून सनद वाटप करण्यात आले.यावेळी विशाल खलोरे व इतर कर्मचारी उपस्थित होते. तालुका कृषी विभागाकडून पीएम किसान लाभार्थी व इतर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कृषी विभागांचे शेंडे, निखारे,उमाटे उपस्थित होते.

वनविभागाचे तोडासे,आनंद आंडणे उपस्थित होते पशु वैद्यकीय विभागांचे महेश आसुटकर, प्रवीण भुसारी, भगवान धारणे होते.अन्न पुरवठा विभागांचे दिनेश रामटेके अक्षय जांभूळकर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर तालुक्यामधील मंडळामध्ये आयोजित करण्यात आलेले असून सर्व नागरिकांनी याचा लाभ घेण्याबाबत आवाहन केले. प्रास्ताविकेत तहसीलदार श्रीधर राजमाने यांनी शिबिरात देण्यात येणाऱ्या विविध विभागाच्या योजनेची माहिती दिली आणि प्रत्येक नागरिकांनी या योजनेची माहिती घेऊन लाभघेण्याचे आवाहन केले. संचालन शुभागी आस्वले यांनी केले तर आभार शुभम बदकी यांनी मानले.

## गोर्लेगाव शिवारामध्ये वादळी वाऱ्यामुळे शेतातील सोलारचे प्रचंड नुकसान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मौजे गोर्लेगाव येथे दिनांक ३० मार्च २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. यामध्ये काही शेतातील शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्यावरील पत्र सुद्धा उडून गेलेले आहेत व काढायला आलेल्या गव्हाची खूप नासाडी झालेली आहे. सोमवारी सायंकाळी सुटलेल्या सुसाट्याच्या वाऱ्याने व वादळी पावसाने गोर्लेगाव येथील शेतकरी प्रवीण प्रभू चव्हाण यांच्या शेत सर्वे क्रमांक ४/३ , परमेश्वर प्रभू चव्हाण यांच्या शेत सर्वे क्रमांक ४/अ व कैलास प्रभू चव्हाण यांच्या शेत सर्वे क्रमांक १०३/१ मध्ये बसवण्यात आलेल्या जीके एनर्जी या सोलार कंपनीचे सोलार पॅनल सुसाट्याच्या वाऱ्यामध्ये उडून गेल्याने त्यांची सोलर पॅनल फुटून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सोलार कंपनीकडून सोलर पॅनल बदलून मिळावे ही मागणी केलेली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन कार्यक्रम




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, शिळफाटा (ठाणे) :** शुक्रवार, दिनांक ०३ एप्रिल २०२६ रोजी शिळ फाटा जंक्शन नाक्यावर, विजय डिजिटल शॉप समोर, शिळ-दिवा रोड, या ठिकाणी सायंकाळी ७ ते ९ यावेळेस हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांना त्रिवार अभिवादन व मानवंदना अर्पण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन सकल हिंदू समाजाकडून करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी ह.भ.प.विश्वनाथ महाराज वारिंगे आणि निलेश राणे (कॅबिनेट मंत्री) निलेशचंद्र महाराज (राष्ट्रसंत जैन मुनी) उपस्थित राहणार आहेत. विश्वनाथ वारंगे महाराज, निलेश राणे कॅबिनेट मंत्री, निलेशचंद्र महाराज राष्ट्रसंत जैन मुनी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन व पुष्पांजली अर्पण करण्यात येणार आहे. साहसी, मैदानी खेळ, ऐतिहासिक पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा होणार आहेत. सकल हिंदू समाजाकडून आव्हान करण्यात आला आहे.

सर्व शिवप्रेमींनी आणि नागरिकांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी. आपली उपस्थिती हीच महाराजांसाठी खरी आदरांजली, मानाचा मुजरा असेल...